# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र२३९/ २०२३

विद्यापीठ अधिकार मंडळांनी घेतलेल्या निर्णयानुसार मार्च, २०२३ उन्हाळी सत्राच्या परीक्षांचे आयोजन दिनांक ०६ जून, २०२३ पासून सुरु करण्यात आलेले आहे. याबाबत सर्व संबंधितांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात आलेले असून परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेली आहेत.

विद्यापीठ संलग्नीत काही महाविद्यालयाकडून प्राप्त विनंतीनुसार संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज व जगत्गुरु श्री. संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान पुणे शहर परिसरातून दिनांक १२/०६/२०२३ ते १६/०६/२०२३ दरम्यान होत आहे. त्यामुळे मार्च, २०२३ सत्राच्या दिनांक १२/०६/२०२३ ते दिनांक १३/०६/२०२३ रोजीच्या सर्व परीक्षांचे पुन:आयोजन करणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, दिनांक १२/०६/२०२३ व दिनांक १३/०६/२०२३ रोजीच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयातील (अहमदनगर, नाशिक व पुणे) परीक्षांचे पुन:आयोजन करण्यात येत असून पुनर्आयोजित केलेल्या परीक्षांचे वेळापत्रक लवकरच विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

तसेच दिनांक १४/०६/२०२३ ते दिनांक १६/०६/२०२३ दरम्यान पालखीचे प्रस्थान हे सासवड परिसरातून होत असल्याने विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर कारणास्तव परीक्षा न देऊ शकणा—या विद्यार्थ्यांची विशेष परीक्षांचे आयोजन करण्यात येत आहे. याकरिता फक्त अशा विद्यार्थ्यांचे विशेष परीक्षेचे अर्ज महाविद्यालयामार्फत परीक्षा विभागास तात्काळ सादर करावेत. या विशेष परीक्षेच्या अर्जाबाबत संबंधित कागदपत्राची पडताळणी करुन त्यानंतर शिफारस करण्यात यावी. तसेच विशेष परीक्षेपासून सदर कारणांमुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी घ्यावी.

मा. प्राचार्य/ संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा—समन्वय/ ७२७
दिनांक: ०८/०६/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.